




दैनिक

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २१९ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.१५ जून २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


# बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन स्थगित : उदय सामंत यांची शिष्टाई

## मागण्या मान्य न झाल्यास २ ऑक्टोबरला मंत्रालयात शिरण्याचा इशारा

अमरावती (वृत्तसंस्था)–शेतकरी कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी गत ७ दिवसांपासून अन्नत्याग उपोषण करणाऱ्या बच्चू कडू यांनी शनिवारी आपले उपोषण स्थगित करण्याची घोषणा केली. या प्रकरणी त्यांनी सरकारला आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी २ ऑक्टोबरपर्यंतची मुदत दिली आहे. सरकारने आमच्या मागण्या मान्य केल्या नाही तर २ ऑक्टोबर रोजी आम्ही थेट मंत्रालयात शिरू, असे ते या प्रकरणी सरकारला इशारा देताना म्हणालेत.प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू गत ७ दिवसांपासून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी अन्नत्याग उपोषण करत होते. या उपोषणामुळे त्यांची प्रकृती खालावली होती. डॉक्टरांनी त्यांना रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला दिला होता. पण त्यानंतरही बच्चू कडू यांनी आपले उपोषण नेटाने पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला होता. त्यांनी परवापासून थेट अन्नत्याग करण्याचाही इशारा दिला होता. त्यामुळे मंत्री उदय सामंत यांनी शनिवारी तातडीने त्यांची भेट घेऊन त्यांना सरकार आपल्या मागण्यांवर सकारात्मक असल्याचे सांगत त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली. त्यानंतर बच्चू कडू यांनी उदय सामंत यांच्या विनंतीचा मान राखत आपले अन्नत्याग उपोषण मागे घेण्याची घोषणा केली. उद्याचे चक्का जाम आंदोलन स्थगित करण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.



### शेतकऱ्यांच्या मुद्यावर एकजूट व्हा

मी आता महाराष्ट्रभर दौरे करेन. हे आंदोलन अधिक मजबूत करेन. तुम्ही कोणत्याही पक्षात राहा. कोणत्याही नेत्याचा मानसन्मान करा. पण शेतकऱ्याच्या मुद्यावर एकजूट व्हा, असे आवाहनही बच्चू कडू यांनी यावेळी जनतेला केले.मी पाणीही सोडण्याचा निर्णय घेतला होता. कारण, हे सरकार तोपर्यंत मानणार नव्हते. पण डॉक्टरांनी माझ्या लिव्हरचा प्रॉब्लेम सुरू झाल्याचे सांगितले. उद्या कदाचित दवाखान्यात भरतीही व्हावे लागेल. त्यामुळे अशा सर्व गोष्टी पाहून आपण तूर्त हे आंदोलन मागे घेत आहोत. आपण २ ऑक्टोबरला पुन्हा नव्या दमाने हे आंदोलन सुरू करू, असे ते म्हणाले.

### २ ऑक्टोबरला थेट मंत्रालयात शिरणार

बच्चू कडू उपस्थितांशी संवाद साधताना म्हणाले, सरकारने आपल्या मागण्यांवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे आपण हे आंदोलन मागे घेत नाही, तर स्थगित करत आहोत. सरकारने आपल्या मागण्यांवर ठोस निर्णय घेतला नाही, तर २ ऑक्टोबर रोजी आपण थेट मंत्रालयात शिरू. आपण सरकारला छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखा चकवा देऊ. सांगू नागपूरला व जाऊ मुंबईला. यांना आपण एकदा छत्रपतींचा गनिमी कावा दाखवू.मुख्यमंत्री सध्या आम्हाला तारीख सांगण्यास तयार नाहीत. पण आम्ही त्यांना २ ऑक्टोबरची तारीख दिली आहे. या तारखेपर्यंत सरकारला कर्जमाफी द्यावीच लागेल. अन्यथा आम्ही त्यांना माफ करणार नाही. आत्ता आपण हे अन्नत्याग आंदोलन स्थगित करत आहोत. मी कार्यकर्त्यांचा अंत पाहू शकत नाही. ते माझ्याशिवाय उठण्यास तयार नाहीत. एक आज्जी तर ऐकण्यास तयारच नव्हती. सर्वच जातीधर्माच्या लोकांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. त्यांचे मी आभार मानतो. हे यश आमचे नव्हे तर इथे येणाऱ्या सर्वांचे यश आहे. आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर आम्ही उदय सामंत यांच्या घराबाहेर आंदोलन करू, असा इशाराही बच्चू कडू यांनी यावेळी दिला

### सरकारची बच्चू कडूंना ३ आश्वासने

शासनाने बच्चू कडू यांना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या स्वाक्षरीचे एक पत्र देण्यात आले आहे. त्यात त्यांना खालील ३ आश्वासने देण्यात आली आहेत. शेतकरी कर्जमाफीसाठी १५ दिवसांत उच्चस्तरीय समिती नेमली जाईल. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कर्जमाफी संदर्भात निर्णय घेण्यात येईल तथा थकीत कर्जदाराच्या सक्तीच्या वसुलीला स्थगिती देणे व नवीन कर्ज वाटप करण्यासाठी बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल. दिव्यांगाच्या मानधन वाढी बाबत ३० जूनच्या पुरवणी बजेटमध्ये तरतूद करण्यात येईल.उर्वरित मुद्यांवर संबंधित मंत्री तथा मुख्यमंत्री महोदय यांच्यासोबत बैठक घेऊन मागण्या निकाली काढल्या जातील.

# केंद्राप्रमाणे अनुकंपा कर्मचाऱ्यांना ही जुनी पेन्शन योजना लागू करा

## खासदार प्रतिभा धानोरकर यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र

**वरोरा । प्रतिनिधी**



अनुकंपा तत्त्वावर शासकीय सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्तीवेतन योजना (जझड) लागू करावी, अशी मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. त्यांनी यासंदर्भात आज (शुक्रवार, १४ जून २०२५) मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवले आहे.खासदार धानोरकर यांनी पत्रात स्पष्ट केले आहे की, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी सरळ सेवा प्रवेशाने रिक्त जागेवर अनुकंपा तत्त्वावर निवड होऊनही १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांवर जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आलेली नाही. यामुळे या कर्मचाऱ्यांवर अन्याय होत आहे.

आज (शुक्रवार, १४ जून २०२५)वरोरा येथे अनुकंपा पेन्शन संघर्ष समितीच्या प्रतिनिधींनी खासदार प्रतिभा धानोरकर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी गुरुदास गुरनुले, नितीन साखरे, वीरेंद्र पिल्लेवान, हरीश मांढरे, नितीन उमरे आणि गजानन बोरकुटे आदी उपस्थित होते.

खासदार धानोरकर यांनी यावेळी सांगितले की, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने २ फेब्रुवारी २०२४ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयात या कर्मचाऱ्यांचा विचार केलेला नाही. केंद्र शासनाने मात्र त्यांच्या अनुकंपा तत्त्वावरील कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू केली आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनानेही तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी त्यांनी शिफारस केली आहे.

अनुकंपा तत्त्वावर सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांची मागणी योग्य असून, त्यांच्या अन्यायाला न्याय मिळाला पाहिजे. केंद्र शासनाच्या निर्णयाप्रमाणेच महाराष्ट्र शासनानेही या कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करावी,अशी विनंती खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मुख्यमंत्र्यांना केली आहे.

# पोलिस पाटील गणेश चौधरी यांच्यावर अंधारात शस्त्रहल्ला

## आरोपींच्या अटकेसाठी मराठा समाजाचा आंदोलनाचा इशारा

**खर्डी । प्रतिनिधी**



शहापूर तालुक्यातील खर्डी विभागातील वरस्कोळ गावचे पोलिस पाटील गणेश चौधरी यांच्यावर अंधाराचा फायदा घेत धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करावी अन्यथा मराठा समाजाकडून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा मराठा समाज मंडळाने दिला आहे.

ही घटना सोमवार, १० जून रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास घडली. दोन तरुण चारचाकी वाहन शिकत असताना भरधाव वेगात वाहन चालवून रस्त्यालगत असलेल्या मुलीला घाबरवत होते. हे पाहून पोलिस पाटील गणेश चौधरी यांनी त्यांना हटकले. या प्रकाराने रागावलेल्या मोहन हळकुंडे व योगेश वाजे या दोघांनी रात्री अंधाराचा फायदा घेत गणेश चौधरी यांच्या मानेच्या मागे धारदार शस्त्राने वार केले.

या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या गणेश चौधरी यांना गावकरी रविंद्र चौधरी व दशरथ चौधरी यांच्या मदतीने तत्काळ खर्डी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी कल्याण येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी पोलिस उपनिरीक्षक सुरेश बाविस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. पोलिसांनी याप्रकरणी तीन पथके तयार केली असून, एक अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. मात्र मुख्य आरोपी अद्याप फरार आहे. लवकरच आरोपीस अटक केली जाईल, असे पोलिस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांनी सांगितले.दरम्यान, या हल्ल्यामुळे खर्डी परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. हल्ला पूर्ववैमनस्यातून झाल्याची चर्चा आहे. या घटनेच्या निषेधार्थ मराठा समाज मंडळाने पोलिस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांना निवेदन दिले असून, येत्या दोन दिवसांत आरोपीस अटक न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## वारकऱ्यांच्या महासागरासाठी सज्ज पंढरपूर!

# आषाढी वारीसाठी १६ लाखांची गर्दी १० हजार पोलिसांचा तगडा बंदोबस्त

**मोहोळ । प्रतिनिधी**



पंढरपूरच्या श्री विठ्ठल–रुक्मिणीच्या आषाढी एकादशीच्या दर्शनासाठी यंदा सुमारे १५ ते १६ लाख वारकरी पंढरपूरात दाखल होणार आहेत, असा अंदाज जिल्हा पोलीस प्रशासनाने वर्तवला आहे. ६ जुलै रोजी रंगणाऱ्या या वारीसाठी यंदा सुरक्षेचा अभूतपूर्व फौजफाटा सज्ज करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाची ही पहिली आषाढी वारी असणार असून गर्दीवर नियंत्रण, वाहतूक सुरळीत ठेवणे आणि अपघातांवर नियंत्रण ठेवणे यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर तयारी केली आहे.गतवर्षी सुमारे १४ ते १५ लाख वारकरी आले होते. मात्र, यंदा आकडा १६ लाख पार जाईल असा अंदाज असल्याने पोलीस बंदोबस्तात मोठी वाढ करण्यात आली आहे.वारीदरम्यान महामार्गांवर वारकऱ्यांचा प्रवास असतो. मागील वर्षी अपघातात काही वारकऱ्यांनी जीव गमावल्याची दुःखद नोंद आहे. यंदा अपघातमुक्त वारीसाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. आरटीओ अधिकारी गजानन नेरपगार आणि पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या पुढाकाराने विविध पथके महामार्गांवर कार्यरत राहणार असून ती वाहतूक नियंत्रण, अपघात प्रतिबंध आणि वारकऱ्यांचे प्रबोधन यासाठी काम करणार आहेत.

### वारी यशस्वी करण्यासाठी बहुआयामी नियोजन

सोलापूर ग्रामीण पोलीस, होमगार्ड, एसआरपीएफ, आरटीओ आणि स्वयंसेवी संस्था यांचा एकत्रित प्रयत्न वारकऱ्यांसाठी सुरक्षित आणि सुरळीत वारीचा अनुभव देण्यासाठी केला जात आहे. शहराच्या मुख्य प्रवेशद्वारांपासून ते मंदिर परिसरापर्यंत प्रत्येक टप्प्यावर कडक व्यवस्था करण्यात आली आहे.

### पोलीस बंदोबस्ताचा तपशील असा

पोलीस अंमलदार: ५४५०
पोलीस अधिकारी: ५४५
होमगार्ड: ३२००
एसआरपीएफ कंपन्या: ६
ड्रोन यंत्रणा: गर्दीवर लक्ष ठेवण्यासाठी कार्यरत

# दारू,पत्ते आणि गुटख्याचा अड्डा बनली जि.प.शाळा; ग्रामस्थ आणि शिक्षक संतप्त



**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील गोळवाडी येथील जिल्हा परिषद शाळा सध्या टवाळखोरांचे अड्डे बनली असून, शाळेच्या आवारात दारू, पत्ते आणि गुटख्याचा सुळसुळाट होत असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. शिक्षणाचा मंदिर असलेल्या शाळेचा परिसर अशा असामाजिक प्रवृत्तीमुळे गलिच्छ होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.१२ जून रोजी मुख्याध्यापिका डिके यांनी संपूर्ण शाळा आवार स्वच्छ करून नव्या शैक्षणिक वर्षासाठी तयारी केली होती. मात्र दुसऱ्याच दिवशी म्हणजे १३ जून रोजी पुन्हा शाळेच्या परिसरात दारूच्या रिकाम्या बाटल्या, पत्त्यांचे ताशे, गुटख्याच्या रिकाम्या पुड्या विखुरलेल्या दिसल्या. इतकेच नव्हे तर भिंतींवर आणि जमिनीवर ठिकठिकाणी गुटखा थुंकल्याने परिसर अस्वच्छ झाला आहे. यावेळी शाळा समितीचे उपाध्यक्ष गणेश मिसाळ आणि चव्हाण सर यांनीही पाहणी करून या दुर्दैवी स्थितीची खात्री केली.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार शाळेच्या आजूबाजूला असलेल्या किराणा दुकानांमध्ये गुटखा खुलेआम विकला जातो, तसेच रस्त्याच्या कडेला दारू विक्रीही सुरु आहे. यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा तसेच शिस्तीचा प्रश्न निर्माण झाला आहे.शिक्षक व ग्रामस्थांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, शाळेच्या परिसरात असलेल्या गुटखा विक्रेत्यांवर तात्काळ कारवाई करावी. तसेच रस्त्यावर सुरु असलेल्या दारू विक्रीला देखील आळा घालावा. अन्यथा भविष्यात गंभीर आंदोलन छेडावे लागेल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. शाळेचा परिसर शिक्षणासाठी सुरक्षित व पवित्र राहावा यासाठी पोलिस व प्रशासनाने तातडीने लक्ष घालून दोषींवर कठोर कारवाई करावी, ही मागणी आता जोर धरू लागली आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बदलापूर शिष्ट मंडळासोबत बैठक; विकासकामांना मिळणार गती

## बदलापूरच्या विविध प्रकल्पांवर मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सविस्तर चर्चा

**बदलापूर । प्रतिनिधी**

बदलापूर शहर व मुरबाड विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी शुक्रवारी सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीस आमदार किसन कथोरे, माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे, किरण भोईर, रमेश सोळंके, जालिंदर सावंत यांच्यासह शिष्टमंडळातील प्रमुख सदस्य उपस्थित होते.या बैठकीत अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांवर सविस्तर चर्चा झाली. यामध्ये बेलवली–कात्रप रेल्वे क्रॉसिंग ओव्हर ब्रिजचा कार्यारंभ, बेलवली ते समर्थ चौक बॅरेज रोडपर्यंत समांतर ओव्हर ब्रिज, कांजूरमार्ग–ऐरोली–शिळफाटा–कटाई–बदलापूर मेट्रो प्रकल्प, कुशीवली धरण, मुरबाड न्यायालयीन नवीन इमारत, उल्हास नदी पूर नियंत्रण रेषा पुनर्निधारण, काळू धरण प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, बदलापूरसाठी स्वतंत्र उपकेंद्र, शाळा बांधकाम, चार लघुपाटबंधारे प्रकल्पांना एमएमआरडीएकडून निधी, बदलापूर सॅटिस प्रकल्प, बॅरेज रोड ते होप इंडिया ओव्हर ब्रिज, पोलीस ठाणे व कर्मचारी वसाहत, नेवाळी नाका बायपास, क्रीडा संकुल आणि नाट्यगृह यांचा समावेश होता.

बैठकीदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक प्रकल्पाचा सविस्तर आढावा घेत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने प्रलंबित प्रकरणांची माहिती सादर करण्याचे निर्देश दिले. सर्व विभागांनी तातडीने अहवाल सादर करावा, त्यानंतर योग्य त्या उपाययोजना राबविल्या जातील, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.आमदार किसन कथोरे आणि शिष्टमंडळाने मांडलेल्या मागण्यांवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे बदलापूर व मुरबाड परिसरातील विकासकामांना आता नव्या गतीने चालना मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



# नंदोरी येथे युवा सेना शाखेचे भव्य उद्घाटन



**नंदोरी । प्रतिनिधी**

युवा सेना नंदोरी शाखेच्या उद्घाटन सोहळ्याचा भव्य कार्यक्रम नुकताच पार पडला. या कार्यक्रमात जिल्हा प्रमुख आलेख रट्टे यांच्या हस्ते शाखेचे उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी शिवसेना संघटक चंद्रपूर युवराज धानोरकर, वरोरा–भद्रावती समन्वयक मुनेश्वर बदखल यांची प्रमुख उपस्थिती होती. नव्याने स्थापन झालेल्या शाखेच्या नेतृत्वाची धुरा संजय दशरथ भोयर यांनी शाखा प्रमुख म्हणून स्वीकारली. त्यांच्या सोबत धीरज गाव (नंदोरी), रितिक जाधव (युवा सेना सचिव वरोरा तालुका), धीरज अंतकरण बगमारे (शाखा उपप्रमुख), मंगेश भाऊराव अवगान (शाखा सचिव), प्रफुल नामदेव एकरे (शाखा सदस्य), तसेच सर्वेश कुंबरे व समस्त नंदोरी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रसंगी बोलताना उपस्थित मान्यवरांनी युवा सेनेच्या नव्या शाखेला मार्गदर्शन केले व भविष्यात संघटनेचे कार्य अधिक बळकट करण्याचा संकल्प व्यक्त केला. नंदोरी परिसरातील युवकांनी पुढाकार घेत युवा सेनेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहनही करण्यात आले.

# यश वाघावलेचा रायगड जिल्हा संघात निवड




**रोहा । ज्ञानेश्वर वाणी**

पुणे (बालेवाडी) येथे १५ जून २०२५ पासून होणाऱ्या १८ वर्षाखालील महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी रायगड जिल्हा मुलांच्या कबड्डी संघाची निवड करण्यात आली असून या संघात जय बजरंग रोहा क्रीडा मंडळाचा कु. यश संजय वाघावले याची निवड झाली आहे. यश हा अष्टपैलू, मेहनती व जिद्दी कबड्डीपटू म्हणून ओळखला जातो. कबड्डी या खेळावर त्याचे असलेले नितांत प्रेम, नियमित सराव व कठोर परिश्रम यामुळेच त्याने रायगड जिल्हा संघात आपले स्थान निश्चित केले आहे. यशच्या या यशामुळे रोहा तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील क्रीडा प्रेमींमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.त्याच्या या यशाबद्दल जय बजरंग रोहा क्रीडा मंडळाचे अध्यक्ष अमर सलागरे यांनी त्याचे अभिनंदन केले असून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## शेतीतली मातीची कन्या आता वर्दीत

# आईच्या डोळ्यांतून वाहिला अभिमानाचा झरा!



**गणेश राठोड । उमरखेड**

शेतीच्या मातीत वाढलेली, मातीच्या गोठ्यात घाम गाळलेली आणि बैलांच्या जोडीबरोबर शेतावर राबलेली सतीका राठोड हिने अखेर पोलीस वर्दीत प्रवेश करत आपल्या संघर्षाला यशाचं नवं मुकुट चढवलं आहे. आईच्या ओथंबलेल्या डोळ्यांतून वाहणारे आनंदाश्रू हा तिच्या यशाचा खरा पुरस्कार ठरला.

जिल्हा परिषद शाळेतील पहिली ते सहावी आणि नंतर धनकी कन्या शाळेत बारावीपर्यंतचे शिक्षण घेतलेली सतीका, गावातील साध्या घरात वाढली खरी; पण तिच्या मनात मात्र एका स्वप्नाचं रोपटं रुजलेलं होतं आई–वडिलांच्या कष्टाला न्याय द्यायचा, काहीतरी मोठं करायचं! शेतीच्या बांधावर बैलांच्या मागे नांगर धरताना जशी तिची हिम्मत वाढत गेली, तशीच तिच्या डोळ्यांतील वर्दीची स्वप्नंही तेजस्वी होत गेली. बैलांची दोरी हातात असताना तिचा अभ्यास कधी थांबला नाही. पुस्तकांची मैत्री जपत तिने कठोर मेहनतीने महाराष्ट्र पोलीस दलात स्थान मिळवलं.नागपूरच्या पोलीस प्रशिक्षण केंद्रात ९ महिन्यांच्या कठोर प्रशिक्षणानंतर जेव्हा सतीका वर्दीत झळकली, तेव्हा तिच्या आई–वडिलांनी बंजारा पारंपरिक पोशाखात उपस्थित राहून आपल्या कन्येच्या कर्तृत्वाला सलाम केला. त्याक्षणी आईच्या पदराने केवळ घाम नव्हे, तर अभिमानाचे अश्रूही टिपले गेले! आई–वडिलांच्या कष्टाला सतीकाने दिलेले हे यशाचे उत्तर आज केवळ तिच्या कुटुंबासाठी नव्हे, तर संपूर्ण परिसरासाठी प्रेरणादायी ठरले आहे.

# सावरगाव येथे ४२ रक्तदात्यांनी रक्तदान करून घडविली सेवा

**तळोधी (बा) । प्रणय बांगरे**

नागभीड तालुक्यातील सावरगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत मंगळवार, दि. १० जून रोजी स्वप्नपूर्ती रक्त सेवा ग्रुप सावरगाव व ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात एकूण ४२ रक्तदात्यांनी रक्तदान करून राष्ट्रीय सेवेतील मोलाची कामगिरी बजावली. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या शिबिराच्या उद्धाटन प्रसंगी तळोधी पोलीस ठाण्याच्या सहायक पोलीस निरीक्षक संगीता हेलोंडे, डॉ. धनंजय ठिकरे, तोसिफ काजी, जि.प. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राजेश शेंडे आदी मान्यवर उपस्थित होते.



रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. एखाद्याचा जीव वाचवण्यात रक्तदान मोलाचे ठरते. ही सामाजिक बांधिलकी जपत स्वप्नपूर्ती रक्त सेवा ग्रुप व ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान नागपूर यांच्या संयुक्त पुढाकारातून हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.या शिबिरात ४२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यामध्ये दोन महिलांचा समावेश होता. विशेषतः रितेश रुकाजी बोरकर व सौ. वेणू रुकाजी बोरकर या आई–मुलाने वट सावित्रीच्या दिवशी रक्तदान करून इतरांसमोर एक आदर्श निर्माण केला. नितेश प्रकाश ठिकरे व वेदप्रकाश गजानन मेश्राम यांच्या रक्तदानाने शिबिराची सुरुवात झाली.या भव्य शिबिराचे यशस्वी आयोजन स्वप्नपूर्ती रक्त सेवा ग्रुपच्या सदस्यांनी परिश्रमपूर्वक केले.

# मौजा सातारा ग्रामपंचायतीला विभागीय स्तरावर संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात दुसरा क्रमांक

## राज्यस्तरीय चमूकडून विविध उपक्रमांची पाहणी; गाव उन्नतीच्या दिशेने पुढे

**चिमूर । शेषराव राऊत**

चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्यातील मौजा सातारा ग्रामपंचायतीने वैराग्य मुर्ती संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात सहभाग घेत स्वच्छता, ग्रामविकास व लोकसहभागाचे उत्तम उदाहरण साकारले आहे. या सहभागाची दखल घेत नागपूर विभागीय स्तरावर सातारा ग्रामपंचायतीने दुसरा क्रमांक पटकावला आहे. ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांनी मिळून नियोजनबद्ध व नियमानुसार स्वच्छता व विकास कामे यशस्वीरीत्या राबवली. गावातील सार्वजनिक सौचालये, वाचनालय, क्रीडांगण, शाळेची स्वच्छता, नाडेप खत प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन केंद्र, जलशुद्धीकरण यंत्रणा, सार्वजनिक शोषखड्डे, वाययामशाळा, गरम पाण्याची व्यवस्था, गटारे, पाण्याचे स्रोत यांसारख्या पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या आहेत.



राज्यस्तरीय चमूकडून नुकतीच गावाची सविस्तर पाहणी करण्यात आली. यावेळी चमूकडून ग्रामपंचायतच्या विविध कामांची तपशीलवार पाहणी करताना घराघरातील स्वच्छतेची व व्यक्तिगत सौचालयांची देखील पाहणी करण्यात आली. गावातील महिलांना स्वयंरोजगाराची संधी देत आर्थिक सक्षमतेकडेही ग्रामपंचायतीने विशेष लक्ष दिले आहे. या पाहणीदरम्यान ग्रामपंचायत सरपंच गजानन गुळधे, चिमूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी नितीन फुलझेले, उपसरपंच वर्षा नन्नावरे, सदस्य वामन बावणे, आशिना नन्नावरे, रविंद्र चौधरी, ग्रामसेवक गुप्ता, विस्तार अधिकारी, पाणीपुरवठा विभाग, रोजगार हमी योजना विभाग, आरोग्य व शिक्षण विभाग, अंगणवाडी सेविका पुष्पा माळवे, आशा वर्कर लता जांभुळे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष रतिरामजी कोडापे, गुरुदेव सेवा मंडळाचे पदाधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज वाचनालयाचे विद्यार्थी, युवक मंडळ, महिला बचत गट व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामपंचायतीने केलेल्या या प्रयत्नांना विभागीय स्तरावर मिळालेला दुसरा क्रमांक म्हणजेच राज्यस्तरीय यशाची पायरी ठरत असून लवकरच राज्यस्तरीय मानांकनातही सातारा ग्रामपंचायत आघाडीवर येईल, असा विश्वास ग्रामस्थांमध्ये दिसून येत आहे.

## मनसे नेते धीरज देसले यांचा गंभीर आरोप

# साक्री तालुक्यात खनिज लुट सुरूच माफियांच्या पाठिशी प्रशासन?

### ग्रामस्थांत संताप; शेती आणि पाणी टंचाईचा धोका

अवैध उत्खननामुळे अनेक गावांमध्ये शेतीचा हवालदिल झाला आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी खालावत आहे. डोंगर पोखरण्यामुळे नैसर्गिक रचना बिघडत असून गावातील जीवनमानावर थेट परिणाम होत आहे.

### मनसेचा आंदोलनाचा इशारा

जर हे लूटमार थांबवली नाही, तर मनसे रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असा इशारा धीरज देसले यांनी दिला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री व खनिकर्म विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान महसूल आणि खनिकर्म विभागाकडून या गंभीर आरोपांवर अजून कुठलेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही.




**धुळे । उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यात डोंगर पोखरले जात असून नैसर्गिक रचना धोक्यात आली आहे, पर्यावरणाचा र्हास होत असून शासनाच्या कोट्यवधींच्या महसुलावर गदा येत आहे – हा गंभीर आरोप करत मनसेचे युवा नेते धीरज देसले यांनी प्रशासनाची झोप उडवली आहे.निंभोरा, मोरगाव, वणी, पिंपळनेर आणि भामेर परिसरात गेल्या काही महिन्यांपासून माती, गिट्टी, वाळू आणि दगडाचे बेकायदेशीर उत्खनन रात्रंदिवस सुरू आहे. जेसीबी, डंपर आणि पोकलँड मशिन्सचा वापर करून डोंगर पोखरले जात असून हे सर्व स्थानिक प्रशासन व खनिकर्म विभागाच्या आशीर्वादानेच सुरू आहे, असा गंभीर आरोप देसले यांनी केला आहे.देसले म्हणाले, शासनाच्या स्पष्ट नियमानुसार खनिज उत्खननासाठी योग्य परवाने, पर्यावरण मंजुरी व महसूल विभागाची परवानगी आवश्यक आहे. मात्र हे सर्व टाळून माफियांनी साक्री तालुक्यात लुटारवाज सुरू केला आहे.

यासंदर्भात मनसेच्या शिष्टमंडळाने प्रांताधिकारी, तहसीलदार, जिल्हाधिकारी यांच्याकडे वेळोवेळी तक्रारी केल्या. परंतु कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, उलट माफियांचे समर्थनच प्रशासनाकडून मिळते आहे, असा आरोप त्यांनी केला.

# 'स्कूल चले हम': प्रवरा हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे ढोल ताशाच्या गजरात जल्लोषात स्वागत



**कोल्हार । प्रतिनिधी**

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा हायस्कूल कोल्हार (उइडए) शाळेचा आज नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ जल्लोषात झाला. दोन महिन्यांच्या उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपल्या लाडक्या शाळेचा मार्ग धरला आणि शाळेचा परिसर विद्यार्थ्यांच्या गडगडाटी हास्याने, उत्साहाने गजबजून गेला.

उन्हाळ्याच्या सुट्टीत काही विद्यार्थ्यांनी कौशल्य विकासासाठी विविध कोर्सेस, समर कॅम्प, स्विमिंग, ॲडव्हेंचर कॅम्पमध्ये सहभाग घेतला; तर काहींनी मामाच्या गावच्या सहली, आजीच्या हातचे चवदार पदार्थ यांचा आनंद घेत सुट्टी साजरी केली. काहींनी होमवर्क वेळेत पूर्ण केला, तर काहींना अजून वही भरायची बाकीच राहिली.शैक्षणिक वर्ष २०२५–२६ च्या पहिल्या दिवशी बालवाडी आणि नर्सरीच्या नवागत चिमुकल्यांनी शाळेत पाऊल ठेवले. काही जण नव्या वातावरणामुळे थोडे घाबरले, डोळ्यांत अश्रू दाटले, तर काहींनी निर्धास्तपणे आपल्या जागा घेतल्या. पालकही आपल्या लहानग्यांची काळजी घेत धीर देताना दिसत होते. काही वेळातच मुलांनी नवीन वातावरणाशी जुळवून घेतले.

या नव्या वर्षाच्या स्वागतासाठी शाळेचे प्राचार्य सुधीर मोरे, शिक्षक योगिता करवा, कडू एस. ई., काळे पी. जे. आदी शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, पेन्सिल व खाऊ देऊन स्वागत केले. चॉकलेट मिळाल्यानंतर मुलांच्या चेहऱ्यावर हसू फुलले आणि संपूर्ण परिसरात आनंदाची लहर उसळली.कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन तांबे जी. व्ही. यांनी केले.

# सेवानिवृत्त पोलीस बांधवांचे आझाद मैदानावर आंदोलन








**वर्धा । प्रतिनिधी**

राज्यातील सेवानिवृत्त व कार्यरत पोलीस कर्मचारी यांच्या प्रलंबित न्याय मागण्यांसाठी ५ जून रोजी मुंबईतील आझाद मैदानावर राज्यव्यापी निवेदन आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे अडीच ते तीन हजार सेवानिवृत्त पोलीस बांधव आणि महिला भगिनी सहभागी झाल्या होत्या.गृह व वित्त विभागाशी संबंधित विविध प्रलंबित मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान गृह व वित्त विभागाचे प्रधान सचिव यांना निवेदन सादर करून चर्चा करण्यात आली. या मागण्यांमध्ये सेवानिवृत्त पोलीसांना एस-१४ वेतनश्रेणीचा लाभ मिळावा, पेन्शन विक्री रकमेची परतफेडीची मुदत कमी करावी, ३० जून रोजी निवृत्त होणाऱ्यांना १ जुलैची वेतनवाढ लागू करावी, सेवा कालावधीत अर्जीत रजेचा फरक मिळावा, वैद्यकीय सेवेचा लाभ मिळावा, पोलीसांची ड्युटी ८ तासांची करण्यात यावी, तसेच राष्ट्रपती पोलीस पदक धारकांसाठी विशेष आर्थिक योजना राबवाव्यात अशा मागण्या करण्यात आल्या.

या आंदोलनाचे नेतृत्व शिखर संस्थेचे अध्यक्ष मा. संपत जाधव यांनी केले. वर्धा जिल्ह्याचे प्रतिनिधित्व जिल्हाध्यक्ष अरुण झोटिंग यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. यावेळी सपोनि गणेश काळे, गजानन कोपरकर, रमेश पोहाणे, विनोद राऊत, संजय कापसे, बाबाराव पिसुर्डे, बाबाराव बोरकुटे, शंकर भलावे, सुरेश भांडारकर, रमेश कोकेवार, प्रदीप कदम, राजू उराडे, दिपक नागापुरे, चंद्रशेखर रोहनकर, रविंद्र बावणेर, प्रकाश गायकवाड, भिमराव खेळकर, रविंद्र पावडे, खुशाल इंचुरकर, प्रमोद बोंडसे, नरेंद्र दिघडे, नामदेव किटे, भास्कर गेडाम, अशोक भोयर, अशोक चौधरी, कवडु बेलेकर, ज्ञानेश्वर वर्धापुरकर, चंदुभाऊ बन्सोड, बबलू ठाकुर आदी सहभागी झाले होते.पोलीस बॉईज संघटनेच्या महिला वर्षा मारबदे, सविता उईके, सुचिता वाघ, वंदना नगराळे, प्रिया ढोणे, शालिनी मुन, सुनिता वाघमारे यांच्यासह विविध जिल्ह्यांतील महिला उपस्थित होत्या. आंदोलन शांततेत पार पडले. सरकारने यावर गांभीर्याने निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# रविंद्र कारोटकर यांची देवळी शहर प्रभारीपदी नियुक्ती

**देवळी । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे माजी शहराध्यक्ष रविंद्र कारोटकर यांची देवळी शहर मंडळ प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव असून, त्यांच्या नेतृत्वातून देवळी शहर भाजपाला निश्चितच बळकटी मिळणार आहे, असे मत कार्यकर्त्यांतून व्यक्त केले जात आहे.रविंद्र कारोटकर हे पूर्वीही शहराध्यक्ष म्हणून सक्रिय भूमिका बजावत होते. त्यांच्या या नवीन जबाबदारीनंतर त्यांनी जिल्हाध्यक्ष संजय गाते, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, देवळी-पुलगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार राजेश बकाने, माजी खासदार रामदास तड़स व माजी नगराध्यक्षा शोभाताई तडस यांचे आभार मानले आहेत.



कारोटकर यांच्या नियुक्तीनंतर भाजपाच्या देवळी शहरातील पदाधिकाऱ्यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. अध्यक्ष उमेश कामडी, संजय मुजबैले, कवीश सुरकार, सुरज कानेटकर, विजय चौधरी, अमोल काकडे, विनोद भगत, भूषण नागोसे, स्वप्नील बुट्टे, आकाश वऱ्हाडे, विक्रम वैद्य, अतुल पाहुणे, मोहन तेलरांधे, शरद आदमने, रमेश सातपुते, दिपक कामडी, दिलीप खाडे, राजू झिलपे, मनोज बेंडे, योगेश आदमने, अंकित टेकाडे,शुभम तऱ्हेकर, विद्याताई झिलपे, शुभांगीताई कुर्जेकर, वर्षा बावनकुळे, वैशाली समर्थ, मनीषाताई लोखंडे, आशाताई वाघमारे आदींनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# सरकारने समिती स्थापन करण्याची नौटंकी करण्यापेक्षा सरसकट कर्जमाफिची घोषणा करावी-माजी मंत्री कांबळे

## सत्तेवर येण्यापूर्वी या सरकारने पहिल्याच कॅबिनेट बैठकीत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते

**वर्धा । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्यासाठी समिती नव्हे, तर नियत लागते. सरकारने वेळकाढूपणा थांबवून तातडीने सरसकट कर्जमाफीची घोषणा करावी, अशी मागणी काँग्रेसचे माजी मंत्री रणजित कांबळे यांनी केली आहे.महायुती सरकारने सत्तेवर येण्याआधी पहिल्याच कॅबिनेट बैठकीत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे जाहीर आश्वासन दिले होते. मात्र, सत्तेवर आल्यावर या आश्वासनाकडे दुर्लक्ष केले गेले, अशी टीका कांबळे यांनी केली.बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, सरकारने आंदोलन थोपवण्यासाठी केवळ समिती स्थापन करण्याचा मार्ग निवडला. पण ही भूमिका पुन्हा एकदा शेतकऱ्यांची फसवणूक ठरू नये.



रणजित कांबळे यांनी बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत सांगितले की, सात दिवस चाललेल्या उपोषणामुळे त्यांची प्रकृती खालावली आहे. त्यामुळे त्यांनी काही दिवस विश्रांती घ्यावी आणि उपचार घ्यावेत, असा सल्ला त्यांनी दिला.सरकारकडे मोठे प्रकल्प, महामार्ग यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आहे, तर मग शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी निधी नसल्याचा दिखावा का केला जातो? असा सवालही कांबळे यांनी उपस्थित केला.त्यांनी सरकारला इशाराही दिला की, शेतकऱ्यांच्या अपेक्षांची पुन्हा एकदा पायमल्ली झाल्यास सरकारची खैर नाही. कर्जमाफीशिवाय पर्याय नाही, ही काँग्रेस पक्षाचीही ठाम भूमिका आहे. त्यामुळे वेळ न घालवता सरसकट कर्जमाफीची घोषणा तातडीने करावी, अन्यथा शेतकऱ्यांचा उद्रेक रोखता येणार नाही.

# प्रहार पक्षाकडून धामणगाव रेल्वे शहर कडकडीत बंद

## शास्त्री चौकात सरकारविरोधात तीव्र निदर्शने

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

शेतकरी कर्जमाफीसह १७ विविध मागण्यांसाठी आमदार बच्चू कडू यांनी मोझरी येथे सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाला राज्यभरातून मिळणारा पाठिंबा दिवसेंदिवस वाढत आहे. याच आंदोलनाच्या समर्थनार्थ प्रहार जनशक्ती पक्षातर्फे आज धामणगाव रेल्वे शहर बंदचे आवाहन करण्यात आले होते. या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.प्रहारचे जिल्हाध्यक्ष प्रवीण हेंडवे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील शास्त्री चौकात सरकारविरोधात जोरदार निदर्शने करण्यात आली. आंदोलनादरम्यान घोषणाबाजी करत शेतकऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी सरकारवर ताशेरे ओढण्यात आले. बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली मागील पाच दिवसांपासून मोझरी येथे सुरू असलेले अन्नत्याग आंदोलन आता राज्यभर पसरले असून अनेक ठिकाणी आंदोलन, मोर्चे सुरू झाले आहेत. राज्यातील विविध पक्षांतील नेत्यांनी देखील या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे.

आजच्या बंद दरम्यान शहरातील व्यापाऱ्यांनीही आपली दुकाने बंद ठेवून आंदोलनाला अप्रत्यक्ष पाठिंबा दिला. रस्त्यावर वाहनांची गर्दी कमी होती, तसेच जनजीवन काही काळ विस्कळीत झाले होते.या बंद आणि निदर्शनात प्रवीण हेंडवे (जिल्हाध्यक्ष), सूरज गंथडे (तालुकाध्यक्ष), निलेश जयसिंगपुरे, अमर गायधने, प्रशांत थोटे, शैलेश टाले, अक्षय धोपटे, प्रवीण रोहनकर, सुधाकर बर्डे, छोटू काकडे, नागेश सोनोने, दीपक पारखंडे, बंडू भोयर, विजय वानखडे, शेख अमीर, राजू नांदुरकर, निखिल मिसाळ, स्वप्निल जायले, अमर काकडे, संदीप धांदे, नितीन हिंगे, दानिश पठाण, प्रणय डावरे, फिरोज पठाण, आशु नरुले, सौरभ वानखडे, किशोर जाधव, संतोष तुमसरे, पंकज काळे यांच्यासह प्रहारचे तालुक्यातील असंख्य कार्यकर्ते सहभागी झाले होते.या बंदच्या निमित्ताने प्रहार कार्यकर्त्यांनी सरकारला स्पष्ट संदेश दिला की शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारने गांभीर्याने लक्ष न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र होणार आहे.




# गोंडवाना गणतंत्र पार्टीचे 'भिक मांगो' आंदोलन

# आदिवासी समाजाला न्याय मिळावा यासाठी शासनाला इशारा

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्यात आदिवासी समाजावर सातत्याने होत असलेल्या अन्याय व अत्याचाराच्या निषेधार्थ गोंडवाना गणतंत्र पार्टीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर भिक मांगो आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाच्या माध्यमातून राज्य शासनाचे लक्ष वेधण्यात आले असून, यासंदर्भातील निवेदन मा. मुख्यमंत्री, मा. आदिवासी विकास मंत्री व मा. आदिवासी आयोग अध्यक्ष यांच्याकडे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सादर करण्यात आले.निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, वर्धा जिल्ह्यातील आदिवासी समाज अनेक समस्या व अन्यायाला सामोरे जात असून, शासन आणि प्रशासन याकडे सातत्याने दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे न्याय न मिळाल्यास गोंडवाना गणतंत्र पार्टीकडून आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

**प्रमुख मागण्या आणि घटनांची माहिती पुढीलप्रमाणे आहे :**

१. उमरी (मेघे) येथील आदिवासी वसतीगृहावर १२ मार्च २०२४ रोजी धारदार शस्त्रांनिशी हल्ला झाला.

२. वसतीगृहातील मुलींची छेडछाड, विद्यार्थ्यांना बळजबरीने वाहनात बसवून मारहाण-तरीही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

३. स्वाती कन्नाके (खेक, पो. स्टे. गिरड) या महिलेला सात ते आठ पुरुष व महिलांनी मिळून अमानुष मारहाण केली.

४. पांडू मरसकोल्हे (शेगाव-गोटाडे) या आजारी व्यक्तीला नानाजी उरकुडे याने उपजिविकेचे साधन नष्ट करून जिवे मारण्याची धमकी दिली; जातिवाचक शिवीगाळही केली, परंतु पोलिसांकडून कारवाई झाली नाही.

५. आकाश राजेराम कुंभरे याचा पांढरकवडा येथे संशयास्पद मृत्यू-शरीरावर जखमा असूनही मृत्यूचे कारण हार्ट अटॅक म्हणून नमूद.



६. लक्ष्मी मानसिंग धुर्वे (२५, येळाकेळी) हिची ढगा जंगलात गळा आवळून हत्या करण्यात आली. परंतु अनुसूचित जमाती संरक्षण कायदा लागू करण्यात आला नाही.

७. आदिवासी अल्पवयीन मुलींवरील विनयभंगाच्या घटना - तरीही शासनाकडून कोणताही मदतनिधी पिडीतांना मिळालेला नाही.

८. गोंडी बोरगाव येथील वयोवृद्ध आदिवासी शेतकऱ्याला वनरक्षकाने अमानुषपणे मारहाण केली, तरीही ॲट्रोसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

९. वानरविहीरा (ता. सेलू) येथे आदिवासी मुलीचे अपहरण व कुटुंबावर प्राणघातक हल्ला.

या घटनांवरून स्पष्ट होते की वर्धा जिल्ह्यात आदिवासी समाजावरील अन्याय गंभीर स्वरूप धारण करत आहे. गोंडवाना गणतंत्र पार्टीने या सर्व प्रकरणांची दखल घेऊन प्रशासनासमोर आक्रोश मांडला आहे. जिल्हाध्यक्ष निलेश मसराम, आशिष पेंदाम, महिला जिल्हाध्यक्ष कविता परचाके, राजू आडे, जिल्हा महासचिव रविंद्र सलामे, विठ्ठल उईके, सुभाष तुमडाम, विनोद उईके, प्रिया मसराम, मंगला उईके, वर्षा मडावी, राहुल उईके, ईश्वर पोरताके, शुभम मडावी, आशिष धुर्वे, सुनील मसराम आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# सावंगी मेघे पोलिसांची कारवाई-देवळी ते पालोती रोडवरील जबरी चोरी, दहशत माजवणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; ५ गुन्हे उघडकीस





**वर्धा । प्रतिनिधी**

देवळी ते वडद व पालोती रोडवर अडवणूक करून जबरी चोरी व दहशत माजवणाऱ्या अज्ञात इसमांचा शोध घेऊन सावंगी मेघे पोलिसांनी मोठा खुलासा केला आहे. या टोळीने मालमत्तेविरुद्ध पाच गंभीर गुन्हे केले असल्याचे उघड झाले असून, चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

फिर्यादी बलराज शंकरराव गुप्ता (रा. वर्धा) यांनी सावंगी मेघे पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, सालोड रोडवरील त्यांच्या बंद घराचे लॉक व दरवाजा तोडून अज्ञात चोरट्यांनी घरातील स्टीलची गॅस शेगडी, सिलेंडर, फायबर बॉडीचे दोन कूलर, वॉटर फिल्टर, तीन टेबल फॅन, दोन गाद्या, स्टील पलंग, तीन प्लास्टिक टेबल्स इत्यादी साहित्य चोरून नेले. या प्रकरणी पो.स्टे. सावंगी येथे गुन्हा क्र. ४५६/२०२५ कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भादंवि नोंदवण्यात आला.त्याचप्रमाणे फिर्यादी संदेश गौतम वाघमारे (रा. झाडगाव) यांनी सुद्धा तक्रार दिली की, दिनांक २७/०४/२०२५ रोजी रात्री ११ वाजता नागठाणा रोडवरील लोखंडी पुलाजवळ मोटारसायकलने जात असताना दोन अज्ञात इसमांनी तोंडाला बांधून फिर्यादी यांना अडवून त्यांच्या खिशातील सॅमसंग मोबाईल व रोख पैसे हिसकावून नेले. यावरून गुन्हा क्र. ४५५/२०२५ भादंवि कलम ३०४(२), ३(५) प्रमाणे नोंदवण्यात आला.या दोन्ही गंभीर गुन्ह्यांचा समांतर तपास करत असताना पोलिसांना माहीतगारामार्फत माहिती मिळाली की पालोती रोडवरील एका बंद घरात चोरीचे साहित्य लपवण्यात आले आहे. पोलिसांनी तत्काळ छापा टाकून प्रज्वल विनोद ठाकरे (वय २२, रा. पोटदुखे ले-आऊट, सावंगी मेघे) यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष केलेल्या तपासणीत सदर घरात वरील चोरीला गेलेले साहित्य मिळून आले.

प्रज्वल ठाकरे याने चौकशीत सांगितले की, त्याने तारासिंग बावरी (रा. सिखबेडा, सावंगी मेघे), संकल्प शेंदरे (रा. तिगाव, आमला) व आकाश ओंकार (रा. आमला) यांच्या मदतीने चोरी केली. त्यांनी हे साहित्य सावंगी ते सालोड रोडवरील चिंतामणी लॉजजवळील बंद घरातून चोरले होते.त्याचप्रमाणे आरोपी प्रज्वलकडे असलेला मोबाईल फोन (सॅमसंग च३१) हा देखील गुन्हा क्र. ४५५/२०२५ अंतर्गत चोरीस गेलेला असल्याचे निष्पन्न झाले.सदर चारही आरोपींना न्यायालयात हजर केले असता, ६ दिवसांची पोलीस कोठडी (झउठ) मिळाली. चौकशीत त्यांनी देवळी एमआयडीसी भागात काम करणाऱ्या कामगारांना अडवून चांदीचे दागिने, मोबाईल व रोकड जबरदस्तीने हिसकावल्याची कबुली दिली.

**त्यावरून पुढील तपासात देवळी पोलीस ठाणे हद्दीत खालील गुन्हे उघडकीस आले**

१. अप.क्र. ४११/२५ कलम ३०४, ३(५) बीएनएस
२. अप.क्र. ४४४/२५ कलम १२६(२), ३०९(४), ३(५) बीएनएस
३. अप.क्र. ४४०/२५ कलम १२६(२), ३०९(४), ३(५) बीएनएस

जप्त मुद्देमाल: गुन्हा क्र. ४५६/२५ अंतर्गत १.३५ लाखांचा मुद्देमाल. गु.क्र. ४५५/२५ मधील सॅमसंग मोबाईल (किंमत १०,०००/-) देवळी पो.स्टे. अंतर्गत टेक्नो व ओप्पो कंपनीचे मोबाईल (किंमत १०,०००/- प्रत्येकी) चांदीची साखळी व अंगठी (१,५००/-) रोकड २,५००/-

**एकूण ५ गुन्ह्यांचा छडा लावण्यात आला असून आरोपी पोलिस कोठडीत आहेत**

**ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलीस अधीक्षक सागर कवडे, उपविभागीय अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पो.नि. संदीप कापडे ठाणेदार सावंगी मेघे यांच्या निर्देशाप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अंबलदार संजय पंचभाई, अनिल वैद्य, निखिल फुटाणे, अमोल जाधव आणि सायबर सेल वर्धा यांच्या पथकाने केली. पुढील तपास संजय पंचभाई करीत आहेत.**

# साक्रीतील 'अवैध साम्राज्य' पाडणार कोण?

## नागरिक संतप्त, पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह

**शहरातील विविध सामाजिक संस्था, महिला संघटना आणि सामान्य नागरिकांनी याविरोधात अनेकदा पोलिसांकडे तक्रारी दिल्या, मात्र कारवाई अद्याप अपुरीच राहिल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. हे अवैध धंदे थांबवायचे असतील, तर पोलिसांनी राजकीय दबाव झुगारून कठोर कारवाई करावी, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून केली जात आहे.**

## 'तंबू बैठकी'त सौम्य चर्चा पण धंदे मात्र बिनधास्त!

**शहरात ठिकठिकाणी होणाऱ्या खासगी चर्चांमध्ये या गैरव्यवहारांवर कुजबूज होत असली, तरी प्रत्यक्षात कठोर कारवाईस टाळाटाळ होत असल्याचे चित्र आहे. काही राजकीय नेते या प्रकरणांवर जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याची चर्चा सध्या चांगलीच रंगली आहे.**




**साक्री । उमाकांत अहिरराव**

साक्री शहरात सध्या वेश्याव्यवसाय, जुगार, सट्टेबाजी, अवैध दारू विक्री यांसारख्या अनेक बेकायदेशीर धंद्यांचे जाळे पसरले असून, हे अवैध साम्राज्य मोडून काढण्याचे मोठे आव्हान नव्याने पदभार स्वीकारलेल्या पोलीस अधिकाऱ्यांसमोर उभे ठाकले आहे.शहरातील काही ठिकाणी हे अवैध धंदे लपूनछपून नव्हे, तर अगदी बेधडकपणे सुरू असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे काही राजकीय आडोशाखाली हे धंदे बिनधास्त सुरू असल्याचा नागरिकांतून आरोप केला जात आहे. काही ठिकाणी राजकीय नेतेमंडळींच्या वरदहस्तामुळेच हे अड्डे फोफावले असल्याचे बोलले जाते.

## नव्या प्रभारी अधिकाऱ्यांसाठी 'अग्निपरीक्षा'

**नव्या पोलीस प्रभारी अधिकाऱ्यांनी कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचा निर्धार घेतला असला, तरी हे अवैध साम्राज्य उद्ध्वस्त करणे ही त्यांच्यासमोरील खरी कसोटी ठरणार आहे. यासाठी फक्त पोलिसांची धाडसाची कारवाई पुरेशी नसून, राजकीय हस्तक्षेपाला झुगारून निष्पक्ष आणि कठोर भूमिका घेणे गरजेचे आहे.**

# निर्मला फाउंडेशनच्या वतीने सेवा वृद्धाश्रमात अन्नदान व कपडा वाटप सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण



**पुलगाव । प्रतिनिधी**

समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखत, निर्मला फाउंडेशन पुलगावच्या वतीने सेवा वृद्धाश्रम येथे अन्नदान आणि कपड्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाद्वारे संस्थेने सामाजिक संवेदनशीलतेचे आणि माणुसकीचे उत्तम उदाहरण सादर केले.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धिरजकुमार मारोतराव नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली, वृद्धाश्रमातील महिला व पुरुष आश्रयधारकांना सन्मानपूर्वक कपडे आणि स्वादिष्ट भोजन वाटप करण्यात आले. यावेळी वृद्धांची आरोग्यविषयक विचारपूसही करण्यात आली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात शंकर चन्ने, प्रवर्तक ऊके, आतिश दुपारे, विशाल कोचे, प्रतिक धांदे, मास्टर संयम नंदेश्वर, प्रिन्स नंदेश्वर, सोनाक्षी कोचे आदी सदस्यांनी सक्रिय सहभाग घेतला.आरोग्य, शिक्षण, रोजगार यांसारख्या मूलभूत गरजांच्या क्षेत्रात काम करताना निर्मला फाउंडेशन सातत्याने नवनवीन सामाजिक उपक्रम राबवत असून, या अन्नदान उपक्रमातूनही त्यांनी आपल्या बांधिलकीची उजळण घातली आहे

# पांडे जि.प.गटात संतोष वारे यांचा अभिनव उपक्रम

## विद्यार्थ्यांना वह्या व शालेय साहित्य वाटपाचा निर्णय

**सोलापूर । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त करमाळा तालुक्यातील पांडे जिल्हा परिषद गटातील विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक उपक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे करमाळा तालुक्याचे कार्यकर्ते संतोष वारे यांनी गोरगरीब शेतकरी व कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी शालेय वह्या व साहित्य वाटप करण्याचा निर्णय घेतला असून त्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे.




पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे दोन दिवसांपूर्वी पार पडलेल्या वर्धापन दिन कार्यक्रमानंतर शरदचंद्र पवार साहेबांचे विचार गावागावात पोहोचवण्याचा संकल्प वारे यांनी केला. याअंतर्गत पांडे जिल्हा परिषद गटातील करंजे, पोथरे, जातेगाव आणि रायगाव या चार केंद्रांतील एकूण २७६६ विद्यार्थ्यांना हा लाभ दिला जाणार आहे.

विद्यार्थ्यांना वह्यांसोबत पट्टी, पेन्सिल, शार्पनर, खोडरबर, पेन आदी आवश्यक साहित्यही दिले जाणार आहे. येत्या १६ तारखेपासून शाळा सुरु होत असून पावसामुळे वह्यांच्या छपाई व पुरवठ्यात थोडा विलंब झाल्याचे संतोष वारे यांनी सांगितले. कोणत्याही पालकांनी स्वतःच्या खिशाला झळ लागू देऊ नये, सर्व साहित्य शाळेत मोफत दिले जाईल,अशी विनंती वारे यांनी केली आहे. या उपक्रमास रोहित दादा पवार आणि निलेशजी लंके यांचे सामाजिक कार्य प्रेरणास्थान असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.समाजातील इतर प्रश्नांवरही चिंता व्यक्तयावेळी वारे यांनी प्रहार संघटनेचे सर्वेसर्वा बच्चूभाऊ कडू यांच्या सुरु असलेल्या शेतकरी उपोषणास पाठिंबा दर्शवित शासनाने तात्काळ सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी केली.तसेच अहमदाबाद येथील विमान दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या २४२ जणांच्या कुटुंबीयांप्रती दुःख व्यक्त करीत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**इयत्तेनुसार विद्यार्थ्यांची संख्या**

| इयत्ता | विद्यार्थी |
|---|---|
| पहिली | ४९६ |
| दुसरी | ४३५ |
| तिसरी | ४५६ |
| चौथी | ४७५ |
| पाचवी | ३३५ |
| सहावी | २६८ |
| सातवी | ३०१ |



# डासांचा प्रादुर्भाव वाढला; शाळा, वाड्या व वस्तीवर तातडीने फवारणी करा–युवासेनेची गटविकास अधिकाऱ्यांकडे मागणी

**करमाळा । प्रतिनिधी**

अतिवृष्टीनंतर करमाळा तालुक्यात डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढला असून नागरिक हैराण झाले आहेत. साथीचे रोग फैलावण्याचा धोका निर्माण झाला आहे. मात्र ग्रामपंचायतीकडून डास प्रतिबंधक फवारणी फक्त कागदावरच सुरू असून गटविकास अधिकाऱ्यांकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत युवासेना तालुकाप्रमुख शंभूराजे फरतडे यांनी तातडीने कारवाईची मागणी केली आहे.यासंदर्भात पंचायत समिती गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देत त्यांनी म्हटले की, अनेक गावांमध्ये गटारी तुंबल्या आहेत, डबक्यांत पाणी साचले आहे, गवत वाढले आहे. शाळांच्या परिसरातसुद्धा पाणी साठा निर्माण झाला आहे. शाळा सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांना डासांमुळे त्रास सहन करावा लागणार आहे. ग्रामपंचायती मात्र याकडे दुर्लक्ष करीत आहेत.



फरतडे पुढे म्हणाले की, गावागावात स्वच्छता आणि आरोग्यावर शासन कोट्यवधींचा निधी खर्च करीत आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीला सेस फंडातून धूळफवारणी यंत्र दिले आहे, प्रशिक्षण, मास्क, ग्लोजसाठी देखील खर्च केला जातो, मात्र प्रत्यक्ष फवारणी होत नाही. ही जबाबदारी टाळली जात असून केवळ कागदोपत्री काम दाखवले जात आहे.

## सार्वजनिक स्वच्छतेचा बोजवारा

**करमाळा तालुक्यात अनेक ठिकाणी ग्रामपंचायतींकडे शौचालयांची वानवा असून लोक जुन्या तालीम, आडोशां मध्ये लघुशंकेसाठी जात असल्याने दुर्गंधीचा प्रसार होतो आहे. सार्वजनिक स्वच्छतेची परिस्थिती गंभीर झाली आहे.**

## गंभीर इशारा : अन्यथा '. बेशरमाच्या फुलांचा हार' आंदोलन

**फरतडे यांनी स्पष्ट इशारा दिला की, ग्रामपंचायतीच्या स्वच्छता कामकाजाचा व खर्चाचा तातडीने आढावा घ्यावा. गटविकास अधिकाऱ्यांनी किती गावांना भेटी दिल्या आणि कोणती कारवाई केली याचा लेखाजोखा सादर करावा. अन्यथा पंचायत समितीच्या कार्यालयास 'बेशरमाच्या फुलांचा हार' घालून आंदोलन केले जाईल.**

# राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त वर्ध्यात छत्री वाटप व भव्य पक्षप्रवेश सोहळा

**वर्धा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मा. राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त वर्धा येथील शासकीय विश्रामगृहात छत्री वाटप आणि भव्य पक्षप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपत नव्या कार्यकर्त्यांचे मनसेत स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन मनसे वर्धा शहर उपाध्यक्ष साहिल किशोर मानकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी अनेक उत्साही युवकांनी मनसेमध्ये जाहीर पक्षप्रवेश करत महाराष्ट्राच्या पुनर्निर्माणासाठी आपले योगदान देण्याची ग्वाही दिली.



कार्यक्रमास मनसे जिल्हाध्यक्ष शंकर पोटफोडे आणि जिल्हा उपाध्यक्ष नितीन अमृतकर प्रमुख उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाने आणि प्रेरणेतून पक्षवाढीच्या दृष्टीने हा सोहळा अत्यंत यशस्वी ठरला.तालुका अध्यक्ष धम्मदीप हिवरकर, तालुका संघटक नितीन परतेकी, उपाध्यक्ष नितीन पोटफोडे, अतुल नांदुरकर, सचिव जिवन पोहनकर, शहर अध्यक्ष ओम क्षीरसागर, तसेच हिंगणघाट, उमरी, झाडगाव येथील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग होता.सुनील बेंदूरकर, कुणाल हिंगे, आकाश ठाकूर, अनिकेत ठाकूर, संकेत गोबाडे, गजानन शिरपूरकर, अमर व्यापारी, चंद्रशेखर राऊत, शॉन झाडे, सिद्धेश्वर महाकाळकर, अनुप कागळे, विशाल राऊत, प्रज्वल ठाकरे, राहुल वैरागडे, ओम मानकर, हर्षल डोंगरे, ऋषभ वर्टी आदी.मनसे कुटुंबात नव्या दमदार कार्यकर्त्यांचे स्वागत करत महाराष्ट्राच्या उज्वल भविष्यासाठी ही वाटचाल अखंड सुरूच राहणार, असे आयोजकांनी सांगितले.

# हिंगणघाटच्या विकासात आणखी एक मैलाचा दगड–आमदार समीर कुणावार यांच्या हस्ते सौंदर्यीकरण व बालउद्यानाचा लोकार्पण सोहळा



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट शहरातील बिडकर वॉर्ड येथे पाण्याच्या टाकीजवळील खुल्या जागेचे रूपांतर सुंदर आणि सुसज्ज बालउद्यानात करण्यात आले असून, या नव्या बागेचे लोकार्पण आमदार समीर कुणावार यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. या लोकार्पण सोहळ्याला परिसरातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला.कार्यसम्राट म्हणून ओळखले जाणारे आमदार समीर कुणावार यांनी आपल्या कार्यक्षम नेतृत्वातून शहराच्या विकासात सातत्याने मोलाचे योगदान दिले असून, या नव्या प्रकल्पातून त्यांनी पुन्हा एकदा आपल्या विकासदृष्टीची प्रचिती दिली आहे.नव्या बालउद्यानात लहान मुलांसाठी झोके, स्लाईड्स, सुरक्षित खेळाची साधने, गवत व फुलझाडांची सजावट, ज्येष्ठांसाठी व्यायाम साहित्य, सुशोभित बैठक व्यवस्था, तसेच चालण्यासाठी ट्रॅक आणि योगासाठी मोकळी जागा अशी विविध सोयी करण्यात आल्या आहेत. हे उद्यान सर्व वयोगटासाठी आनंददायी आणि निरामय वातावरण निर्माण करणारे ठरणार आहे. या प्रकल्पाचे श्रेय आमदार कुणावार यांनी भाजप सरकारच्या विकासाभिमुख धोरणाला आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाला दिले. शहराच्या प्रत्येक वॉर्डात विकास पोहोचवण्याचा आमचा संकल्प आहे आणि हे बालउद्यान त्याच दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे, असे आमदार कुणावार यांनी यावेळी सांगितले.या कार्यक्रमास परिसरातील नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत आमदार कुणावार यांचे आभार मानले.

# वाल्याचा वाल्मिक करणारे आमचे नेते; बगलबच्चे नाही तर सच्चे कार्यकर्ते आहोत–रोह्यात राष्ट्रवादीचा शिंदे गटावर हल्लाबोल



**रोहा । प्रतिनिधी**

शिवसेना शिंदे गटाने घेतलेल्या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसवर झालेल्या टीकेला राष्ट्रवादीने चोख प्रत्युत्तर दिले. आमचे नेते हे वाल्याचा वाल्मिक करणारे आहेत, अशी घणाघाती प्रतिक्रिया माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे यांनी दिली. तर बगलबच्चे नाही तर सच्चे कार्यकर्ते आहोत असे ठाम विधान तालुका कार्याध्यक्ष व माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांनी केले.शिवसेना शिंदे गटाचे तालुका प्रमुख ॲड. मनोजकुमार शिंदे यांनी मागील रविवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादीवर टीका केली होती. त्याला उत्तर देताना राष्ट्रवादी काँग्रेसने गुरुवारी (१२ जून) सार्वजनिक बांधकाम विश्रामगृहात पत्रकार परिषद घेऊन शिंदे गटावर जोरदार हल्लाबोल केला.

यावेळी शहराध्यक्ष अमित उकडे, उपाध्यक्ष चंद्रकांत पार्टे, माजी उपनगराध्यक्ष जितेंद्र पडवळ, मयूर पायगुडे, निलेश शिर्के आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

महाडच्या माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप यांच्या राष्ट्रवादी प्रवेश कार्यक्रमात राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी शिवसेना नेते ना. भरत गोगावले यांची नॅपकिन नक्कल केल्याने दोन्ही पक्षांमध्ये कलगीतुरा सुरु झाला आहे. त्यामुळे रायगड जिल्हा पालकमंत्री पदाचा वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.कार्याध्यक्ष समीर शेडगे यांनी शिंदे गटावर टीका करताना म्हटले, महायुती सरकारमध्ये वरिष्ठ पातळीवर आमचे नेते एकत्र आहेत. एकनाथ शिंदे यांनीही माणगाव येथील कार्यक्रमात खासदार तटकरे यांचे भरभरून कौतुक केले होते. मग स्थानिक नेत्यांकडून का टीका केली जाते? त्यांची ती पात्रता आहे का?वरसे ग्रामपंचायतीच्या संदर्भात बोलताना शेडगे म्हणाले, तुमचा सदस्य स्वतःच खासदार तटकरे यांच्याकडे आला, त्याला सरपंच करण्यात आले. यात तटकरे यांचा काय दोष?माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे म्हणाले, आमचा नेता विकासाचा हत्ती आहे. कर्जतपासून पोलादपूरपर्यंतचा इतिहास पाहिला तरी समजेल की खऱ्या अर्थाने वाल्मिक कराड निर्माण करणारे आमचे नेते आहेत. रायगड जिल्ह्यातील शिवसेना नेत्यांनी विकासकामांचीच चर्चा करावी, मग जिल्ह्याचा नेता कोण हे स्पष्ट होईल.महेश कोलटकर यांनीही ठाम भूमिका मांडत सांगितले, आमचे दैवत छत्रपती शिवाजी महाराजच आहेत; त्याचप्रमाणे आमचे नेते खासदार तटकरे व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहेत.या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादीने ॲड. शिंदे यांच्यावर गंभीर आरोप करताना, ११ जानेवारी रोजी रोहा पोलीस स्टेशनमध्ये एका अल्पवयीन बालिकेवरील अत्याचारप्रकरणी पोलीसांत गुन्हा नोंद होत असताना आरोपींच्या बाजूने सहानुभूती व्यक्त केल्याचा ठपका ठेवला. पीडितेच्या नातेवाईकांनी याचा निषेध करत राष्ट्रवादीच्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .